जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा शनिवारी ५५ वा वर्धापन दिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापन दिन शनिवार १८ रोजी सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन सोहळयासाठी नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थिती दर्शवणार असून, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत.

वर्धापन दिनी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार आदी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2017
सकाळ

# विद्यापीठात शनिवारी गौरव समारंभ

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापन दिन शनिवारी (ता. १८) होत आहे. त्यानिमित्त विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय, सेवक, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव होणार आहे. विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या गुणवंत पाल्यांचाही गौरव होईल. कार्यक्रमास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. पी. काणे यांची प्रमुख उपस्थिती आहे. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवतील. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी कार्यक्रम होईल.

16 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# 'सिनेट'साठी ३३ मतदान केंद्रे

## उद्या मतदान; सर्व केंद्रावर आज साहित्य पोहोचणार

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळासाठी (सिनेट) शुक्रवारी (ता.१७) होत असलेल्या निवडणुकीच्या तयारीसाठी विद्यापीठ प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. या निवडणुकीची मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने ११५ कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असून, या कर्मचाऱ्यांना कार्यशाळेद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. दरम्यान, गुरुवारी (ता.१६) रात्रीच मतदान केंद्रावर पोहोचण्याची सूचनाही कर्मचाऱ्यांना विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या १४६ जागांसाठी शुक्रवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे. २० नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार प्रथमच ही निवडणूक होत असून, विधानसभा निवडणूक धर्तीवर रचना करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार आहे. निवडणुकीच्या मतदानासाठी कोल्हापूर सांगली व सातारा या जिल्ह्यातील ३३ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर ३८ बूथ असून, २२ हजारांहून अधिक मतदार मतदान करणार आहेत. पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक गटात मतदारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या गटातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांमध्ये प्रचंड चुरस आहे. तसेच प्रचाराच्या अंतिम टप्प्यावर भेटीगाठी, दूरध्वनी आणि सोशल मीडियाद्वारे प्रचार केला जात आहे.



- ३३ केंद्रावर होणार मतदान
- २२ हजारांवर मतदार
- ११५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती
- मतदान प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर
- मतदानाच्या पूर्वदिनीच कर्मचारी केंद्रावर होणार हजर
- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्ये मतदार केंद्रे

3H

### मतदारांकडे आवश्यक कागदपत्रे (यापैकी एक)

- निवडणूक ओळखपत्र
- पासपोर्ट
- वाहनचालक परवाना
- पॅनकार्ड
- राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक
- स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र
- जातप्रमाणपत्र
- आधारकार्ड

### १७ नोव्हेंबरला सुट्टी

सिनेट निवडणुकीच्या मतदानादिवशी शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारितील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये तसेच विद्यापीठाला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिपाईपासून प्राचार्यांपर्यंत सर्वांना सुट्टी लागू असेल, असे विद्यापीठ प्रशासनाने पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.


16 NOV 2017 पुढारी

# अधिसभेसाठी उद्या मतदान

## प्रचार अंतिम टप्प्यात; माघारी अन् पाठिंब्याच्या घोषणा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांसाठी शुक्रवारी (दि. १७) मतदान होणार आहे. १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानाचा दिवस जवळ आल्याने सर्वच गटांतील उमेदवारांकडून अंतिम टप्प्यात प्रचार सुरू आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा येथील एकूण ३३ केंद्रांवर ३८ बूथद्वारे मतदान होणार आहे. यासाठी एकूण २२ हजारांहून अधिक मतदार आहेत. अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या उमेदवारांकडून प्रचाराचा वेग वाढला आहे. विकास आघाडी आणि 'सुटा'कडून आज अनेक ठिकाणी बैठका घेऊन प्रचार करण्यात आला. दरम्यान, आज काही उमेदवारांनी जाहीर माघार घेऊन पाठिंब्याच्या घोषणा सोशल मीडियातून दिल्या आहेत. हा अंतिम टप्प्यातील प्रचाराचा भाग असल्याने अखेरच्या दिवशी आणखी काही उमेदवार माघार घेतील, अशी चर्चा सुरू आहे. दरम्यान, महाविद्यालयीन शिक्षक गटासाठी साडेतीन हजार मतदान आहे. या गटांत 'सुटा'ने जोरदार फिल्डिंग लावली आहे. आघाडीने या गटातील 'सुटा'चे वर्चस्व मोडून काढण्यासाठी वेगवान प्रचार सुरू केला आहे. त्यामुळे या गटातील उमेवारांकडून पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत प्रचार सुरू आहे. कॉलेजवर लेक्चर देऊन ही प्रचारमोहीम जोमात सुरू आहे.



शिवाजी विद्यापीठातून

### 'पदवीधर'मध्ये चुरस

*नोंदणीकृत पदवीधर गटात नऊ जागांवर निवडणूक होत आहे. चौदा हजारांहून अधिक मतदार या गटात आहेत. यामध्ये प्रचंड चुरस आहे. खुल्या गटात मोठ्या संख्येने उमेदवार उभे आहेत. विकास आघाडीकडून नऊ जागांवर उमेदवार उभे आहेत. तर विद्यार्थी कृती समितीकडून चार जागांवर उमेदवार उभे आहेत.*

16 NOV 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा अधिकार मंडळांसाठी उद्या मतदान

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांसाठी शुक्रवारी (ता. १७) मतदान होत आहे. १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात आहेत. कोल्हापूर, सांगली व सातारा येथील एकूण ३३ केंद्रांवर ३८ बूथवर मतदान होईल.

अधिसभा व विविध मंडळांच्या निवडणुकीसाठी अनेक दिवसांपासून उमेदवारांची धावपळ सुरू आहे. प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियासह प्रत्यक्ष भेटीवर भर दिला. तसेच अधिसभेवर निवडून आल्यानंतर आपण काय काम करणार, याचीही माहिती दिली जात होती.

आज अखेरच्या दिवशी काही उमेदवारांनी माघार घेतली. यासाठी आघाडीचे आणि सुटा या दोन्ही बाजूने प्रचाराची जोरदार मोहीम राबविली. प्रत्येकाला आपणच विजयी होणार असल्याची खात्री वाटत आहे. नोंदणीकृत पदवीधर गटात नऊ जागांवर निवडणूक होत आहे. चौदा हजारांहून अधिक मतदार या गटात आहेत. त्यामुळे मोठी चुरस आहे.

**२२ हजार मतदार**

अधिसभा व विविध मंडळांच्या निवडणुकीसाठी तब्बल २२ हजार मतदार मतदान करणार आहेत. दोन्ही गटाच्या उमेदवारांनी प्रत्येक मतदारापर्यंत पोचण्यासाठी विविध मार्ग अवलंबले. किमान बोलणे होईल किंवा आपले मत त्यांच्यापर्यंत कसे पोचेल, यासाठी यंत्रणा सक्रिय केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 NOV 2017
लोकमत

# विद्यापीठ अधिसभा निवडणुकीची तयारी, प्रचार अंतिम टप्प्यात

## उद्या मतदान : मतपात्रिकांचे वाटप पूर्ण; माघारीसाठी हालचाली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि.१७) मतदान आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून या मतदानाची तयारी आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आघाडी, संघटनांकडून प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. बुधवारी विद्यापीठाने मतपत्रिकांचे गटनिहाय वाटप पूर्ण केले.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी उद्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील ३३ मतदान केंद्रांवर ३८ बूथद्वारे मतदान होणार आहे. मतदान आणि मतमोजणीच्या प्रक्रियेसाठी विद्यापीठातील ११५ कर्मचारी कार्यरत असणार आहेत. या निवडणुकीसाठीचे मतदान दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने मतपत्रिका, मतपेट्यांचे गटनिहाय वाटप, आदी स्वरुपांतील तयारी विद्यापीठात बुधवारी वेगाने सुरु होती. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विष्णू खाडे यांनी निवडणूक प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ विकास मंच, विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यासह अपक्ष उमेदवारांच्या प्रचाराने गती घेतल्याचे दिसून आले. विविध गटनिहाय बैठका घेऊन त्यांनी प्रचार केला.

काही संघटनांकडून आपल्या आघाडी, युतीमधील जास्तीत जास्त उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु आहेत. त्याअंतर्गत अन्य उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी त्यांच्याकडून संबंधित उमेदवारांनी भेट घेऊन, दूरध्वनीवरून संपर्क साधणे अशा हालचाली वेगाने सुरु होत्या.

### काहींची स्वेच्छेने माघार

पदवीधर गटातील खुल्या प्रवर्गातून नितीन पाटील, अमित जाधव यांनी, तर प्राध्यापक प्रवर्गातील खुल्या गटामधील डॉ. गिरीश नाईक, भरत पाटील, किशोर जाधव आणि महिला प्रवर्गातून डॉ. विद्या पाटील यांनी स्वेच्छेने माघार घेतली आहे. त्यांनी विद्यापीठ विकास मंच आणि विद्यापीठ विकास आघाडी पाठिंबा दिला. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने त्यानां पाठिंबा दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2017
Times of India

# SUK emerges runners up at inter-varsity youth fest

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur bagged 12 prizes in the inter-university youth festival Indradhanush, to emerge runners up. The festival was organised at Vasantrao Naik Marathwada Agricultural University in Parbhani from November 5 to 9. A team of 40 members from SUK had participated in the festival.

R V Gurav, director, student welfare, said, "There were around 25 events like solo and group performances in folk dance, classical singing, classical dance, one-act play, street play, debates and group song and folk orchestra."

**Before Diwali this year, the university had invited experts from Mumbai to scrutinize the likely participants in the 40-member team**



He said, "Our team participated in 19 events and won prizes in 12 events. We won prizes in folk music and classical singing. The team also managed to bag prizes in group song, one-act play, folk dance and miming."

Before Diwali this year, the university had invited experts from Mumbai to scrutinize the likely participants in the team. A camp was also organized for students to polish their skills.

The participants were provided with all facilities during the camp, Gurav said.

He further said the university team is now preparing for the west zone youth festival to be conducted at Udaipur in Rajasthan, next month.